Total No. of Questions : 3]

SEAT No. :

# P2893

[Total No. of Pages : 3

## [5801]-219
## First Year B.Com.
## MARATHI (मराठी) - II
## 127 - B : भाषा आणि कौशल्य विकास
## (CBCS 2019 Pattern) (Semester - II)

अभ्यासक्रम : 1) अर्जलेखन व पत्रलेखन
2) प्रशासनिक मराठी
3) प्रगत भाषिक कौशल्ये
4) जाहिरात लेखन

*वेळ : 2½ तास]* *[एकुण गुण : 70*

सूचना : *1)* सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
*2)* उजवीकडील अंक प्रश्नांचे गुण दर्शवितात.

---

**प्र.*1)*** अ) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर लिहा. **[10]**

i) दिनांक 25 मे 2022 रोजीच्या 'दैनिक सकाळ' मधील जाहिरातीच्या आधारे शासकीय कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मुंबई मधील 'लिपिक' या पदासाठी नोकरीचा अर्ज लिहा.

ii) तुमच्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांना बोनाफाईडची मागणी करणारा विनंती अर्ज लिहा.

ब) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर लिहा. **[10]**

i) तुमचा मित्र इयत्ता 12 वी च्या परीक्षेमध्ये संबंध महाराष्ट्रातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. त्याबद्दल त्याचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

ii) ई-मेलचे महत्त्व लिहा.

**प्र.*2)*** अ) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर लिहा. **[10]**

i) सह्याद्री सहकारी पतसंस्था, अहमदनगरच्या कार्यकारी मंडळाची सभा गुरूवार दिनांक 26/05/2022 रोजी लोकमान्य टिळक सभागृह, अहमदनगर येथे सकाळी 11 वा. संपन्न झाली. सदर सभेचे इतिवृत्त लिहा.

ii) तुमच्या महाविद्यालयात कोविड-19 प्रतिबंधात्मक लसीकरण शिबिर राबविण्यात येत आहे. त्याविषयीचे माहितीपत्रक तयार करा.

ब) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर लिहा. **[10]**

i) तातडीच्या दुरूस्तीच्या कामाकरीता तुमच्या परिसरातील वीज पुरवठा खंडित केला जाणार आहे. त्याबद्दलचे महावितरण कंपनीच्या वतीने जाहीर निवेदन तयार करा.

ii) खालीलपैकी कोणत्याही दहा पारिभाषिक संज्ञा लिहा. **[10]**

i) Agreement
ii) Auditor
iii) Budget
iv) Capital
v) Circular
vi) Finance
vii) Login
viii) Report
ix) Save
x) Information
xi) Mobile
xii) Manager

***प्र.3)*** अ) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर लिहा. **[15]**

i) खालील उताऱ्याचे एक तृतीयांश सारांशलेखन करून त्यास समर्पक शीर्षक द्या.

जगाच्या सुखाला वैराग्याचे विरजण घालणारे आणि दु:ख रोगाला बरे करणारे औषध म्हणजे एक ग्रंथवाचनच होय. कारण ग्रंथांमध्ये अशीच काही विलक्षण जादू भरलेली असते. ईश्वराच्या सर्वगुणसंपन्नतेचा पृथ्वीवरील खरा प्रतिनिधी झाला तर एक ग्रंथसंग्रहच होऊ शकेल. मनुष्य होऊ शकणार नाही! एखाद्या लहानशा का होईना, ग्रंथसंग्रहालयामध्ये आपण बसलो असता वर्तमान व भूत या दोन काळांतील अंतर आपणास तोडून टाकता येते आणि गतकाली होऊन गेलेल्या कोणत्याही महानुभाव ज्ञात्या पुरूषाच्या आत्म्याशी समरस होऊन त्याच्या सहवासात व संभाषणात काळ घालवता येतो.

जशी भावना तसे फळ देणारे ग्रंथाशिवाय दुसरे कोणीही नाही. इतके असूनही तुम्ही त्यांना जसे वागवाल तसे वागण्याइतकी लीनता ग्रंथांच्या अंगी असते हे वेगळेच! अहर्निश अष्टौप्रहर तुमच्या सेवेला अविश्रांत सादर होणारा ग्रंथासारखा दुसरा सेवक तुम्हाला मिळणार नाही. तुम्ही स्नेही या नात्याने त्यांना जवळ ओढले तर स्नेहयाप्रमाणे गोड वागतील व सर्वस्वी नि:स्पृह असाच सल्ला देतील. शिष्य या नात्याने तुम्ही त्यांचा आदर केला तरी मानवी गुरूप्रमाणे ते तुम्हास न शिणवता व न सताविता विद्या देतील. प्रतिपक्षी या नात्याने तुम्ही त्यांच्याशी वाद आरंभिला तर तुमच्या जडबुद्धीवर आपली कानस घासून ती सतेज करण्यास किंवा युक्तिवादाने तुम्हास निरूत्तर करून तुमच्या गर्वपरिहार करण्यास ही त्यांची तयारी आहेच. तुमचे अज्ञान कितीही ढोबळ असले तरी ते तुम्हाला हसून खिजवणार नाहीत. किंवा फजिती करून तुमचा पाणउताराही करणार नाहीत. प्रत्येक मानवी गुरूमध्ये आपल्या प्रिय शिष्यापासूनही थोडी–बहूत विद्या किंवा एखादी तरी गुरूकिल्ली लपवून ठेवण्याची खोड आढळेल. पण ग्रंथाइतका प्रांजळ व निष्कपटी गुरू दुसरा मिळणारच नाही.

ii) खालील इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा.

A great part of arabia is desert. Here there is nothing but Sand and Rock. The sand is so hot that you cannot walk over it with your bare feet in the day time. Here and there in the desert are springs of water that come from deep down under the ground. So deep that the sun can not dry them up. These springs are few and far apart, but wherever there is one, green grass very soon covers the ground all around it. Soon fig trees and palm trees grow tall and graceful making a cool, green, shady place around the spring. Such a place is called oasis.

ब) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर लिहा. **[15]**

i) तुम्हांस आवडणाऱ्या कोणत्याही एका दुचाकीची वर्तमानपत्रासाठी जाहिरात तयार करा.

ii) 'फिनोलेक्स् पाईप' ची आकाशवाणीकरीता जाहिरात तयार करा.

☯☯☯☯